-: प्रेसनोट दिनांक- ०३/०७/२०२० :-

**धनाजी हरी सराटे, पोलीस नाईक, ब.नं. १६१४, नेम. शाहुवाडी पोलीस ठाणे, कोल्हापूर, सध्या रा. रामचंद्र माने यांचे घरी भाडयाने, चनवाड रोड, शाहुवाडी, ता. शाहुवाडी, मुळ रा. मु.पो. देवाळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांनी लाच मागणी करून लाच स्विकारलेबाबत.........**

---

यातील तक्रारदार यांचे साडु व त्यांचे घरातील लोक आणि त्यांचे चुलत मेव्हणे यांचेत दि. ०८/०६/२०२० रोजी शेत जमीनीच्या वादातुन भांडण झालेले होते. त्यावेळी चुलत मेव्हन्याने तक्रारदार यांचे साडु व त्याचे घरातील इतर पाच लोकांचे विरूध्द शाहुवाडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला होता. त्याच दिवशी तक्रारदार यांचे साडु यांनी ही त्यांचे चुलत चुलत मेव्हन्यांचे विरूध्द शाहुवाडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केलला होता. तक्रारदार यांचे साडवा विरूध्द दाखल असले गुन्हयाचा तपास शाहुवाडी पोलीस ठाणेचे पोलीस नाईक सराटे हे करीत आहेत.

आज दिनांक ०३/०७/२०२० रोजी सकाळी ०७.३० वा चे सुमारास तक्रारदार यांचे साडु यांनी तक्रारदार यांना त्यांचे शेंबवणे येथे घरी बोलाविलेने तक्रारदार तेथे त्यांचे घरी गेले. त्यावेळी तक्रारदार यांचे साडुने त्यांना आज पोलीस सराटे साहेबांनी गुन्हयातील सर्वांना शाहुवाडी पोलीस ठाणे येथे बोलावले आहे. तेथे तुम्ही सोबत चला असे सांगितलेने तक्रारदार, त्यांचे साडु व घरातील इतर लोक असे सकाळी ०९.०० वा चे सुमारास शाहुवाडी पोलीस ठाणे येथे गेले होते. त्यावेळी पोलीस नाईक सराटे हे तक्रारदार व इतरांना भेटले, त्यांनी तक्रारदार यांचे साडु व त्यांचे घरातील लोकांना अटक केली व ऑनलाईन कोर्टासमोर हजर करतो असे सांगुन'तुझा साडु व त्याचे सोबतचे इतर पाच जण आरोपी यांना त्यांचेवर दाखल असले गुन्हयात मदत करतो, तुम्ही मला प्रत्येक आरोपीचे ५०००/- रू. प्रमाणे ०६ जणांचे एकुण ३०,०००/- रूपये दया., असे म्हणुन लाचेची मागणी केलेने तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे आज दिनांक ०३/०७/२०२० रोजी पोलीस नाईक सराटे यांची शाहुवाडी पोलीस ठाणे येथे शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये पोलीस नाईक सराटे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे साडु व त्यांचे घरातील लोकांविरूध्द दाखल गुन्हयामध्ये मदत करण्यासाठी तडजोडीअंती २०,०००/- रू. लाचेची मागणी करून ती लाच रक्कम लागलीच घेवुन येण्यास सांगितलेचे निष्पन्न झाले.

त्यानुसार लागलीच शाहुवाडी पोलीस ठाणेचे बांधकाम चालु असले नवीन इमारतीचे आवारात सापळा कारवाई आयोजित केली असता, आरोपी लोकसेवक पोलीस नाईक सराटे यांनी तक्रारदार यांचे साडु व त्यांचे घरातील लोकांविरूध्द दाखल गुन्हयामध्ये मदत करण्यासाठी तडजोडीअंती मागणी केलेप्रमाणे २०,०००/- रू. लाच रक्कम स्विकारल्याने त्यास रंगेहात पकडणेत आले आहे. सदरबाबत तक्रारदार/फिर्यादी यांचे फिर्यादीवरून धनाजी हरी सराटे, पोलीस नाईक, ब.नं. १६१४, नेम. शाहुवाडी पोलीस ठाणे, कोल्हापूर, सध्या रा. रामचंद्र माने यांचे घरी भाडयाने, चनवाड रोड, शाहुवाडी, ता. शाहुवाडी, मुळ रा. मु.पो. देवाळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांचेविरूध्द शाहुवाडी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, पोहेकॉ मनोज खोत, पोना विकास माने व नवनाथ कदम, पोकॉ मयुर देसाई, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४)हेल्पलाईन टोल फ्री कमांकः- १०६४, ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**